# जे. कृष्णमूर्ती नावाचे गूढ

**मंजूषा आमडेकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**जे. कृष्णमूर्ती नावाचे गूढ**
मंजूषा आमडेकर

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखिका**
मंजूषा आमडेकर
बी-६, सुहृद सोसायटी,
इरंडवणे, पुणे-४.
फोन नं. ०२०-२५४१०२३८ मो. नं. : ९४२३००२२८१

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३४०/-

## अर्पणपत्रिका

माझे आई-वडील आणि मीना, संतोष अन स्मिता या भावंडांना सप्रेम अर्पण.

## जे. कृष्णमूर्तींचे एखादे उद्धरण

*होय. मला सत्याचा साक्षात्कार झाला आहे. मी माझ्या प्राणसख्याशी एकरूप झालो आहे. मी त्याला विशिष्ट चौकटीत बांधायचं सोडून दिलं आणि त्यामुळेच तो मला जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी दिसायला लागला. मी तुम्हालाही त्या सत्याचं दर्शन कसं करायचं ते बोट दाखवून सांगू शकेन; पण त्याचा शोध मात्र तुमचा तुम्हालाच घ्यावा लागेल. मी माझी विचारधारा मुद्दामहूनच धूसर ठेवणार आहे. विषय समजावून सांगणं मला मुळीच अवघड नाही; पण मी ते करू इच्छित नाही. कारण कोणतीही गोष्ट सोपी करून सांगितली की, तिच्यातला प्राण निघून जातो. म्हणूनच माझ्या सांगण्यात मी जाणीवपूर्वक संदिग्धता राहू देणार आहे.*

*-जे. कृष्णमूर्ती*

## ऋणनिर्देश

जे. कृष्णमूर्ती या अथांग व्यक्तिमत्त्वाबद्दल जाणून घ्यायची माझी खूप दिवसांपासून इच्छा होती; पण काही ना काही कारणानं ते राहून जात होतं. हे पुस्तक लिहिण्याच्या निमित्तानं माझी ती जिज्ञासा तृप्त झाली. मला ही संधी दिल्याबद्दल मी 'रिया पब्लिकेशन्स्'चे श्री. शितल मेहता यांची मनापासून आभारी आहे. मला काही मित्र-मैत्रिणींनी जे. कृष्णमूर्तींवरील पुस्तकं उपलब्ध करून दिली. अंजनी सहस्रबुद्धे आणि गायत्री सेवक या दोन प्रेमळ मैत्रिणींनी स्वत:कडची जपून ठेवलेली पुस्तकं मला वापरायला दिली. अंजनीनं तर स्वत: कृष्णमूर्तींना पाहिलं आहे, त्यांची व्याख्यानं ऐकलेली आहेत. तिनं तिचा अनुभव आणि काही आठवणी शेअर केल्या. श्री. आशुतोष आणि श्री. किशोर खैरनार हे दोघे कृष्णमूर्तींचे अनुयायी आहेत. त्यांच्या फाऊंडेशनसाठी कामही करतात. जवळपास वाहूनच घेतलं आहे त्यांनी स्वत:ला. त्यांच्याकडे मला बरीच पुस्तकं विकत मिळाली. त्यांनी अनुभव सांगितले. पती अभिजीत आणि मुलगी मालविका यांची साथ तर नेहमीच असते. त्याखेरीज कामात झोकून देता येणं शक्य नव्हतं. या सर्वांचे मी सस्नेह आभार मानते. धन्यवाद!

✦✦✦

## *लेखिकेची भूमिका*

जे. कृष्णमूर्ती ही व्यक्ती म्हणजे साक्षात 'गूढ' होते. त्यांचं तत्त्वज्ञान समजायला आणि पचवायला जितकं असामान्य आहे तितकंच त्यांचं जीवनचरित्रही अनन्यसाधारण आहे. ज्यांना कृष्णमूर्ती यांचा नव्यानं परिचय करून घ्यायचा असेल, त्यांचं तत्त्वज्ञान समजून घ्यायचं असेल, त्यांनी प्रथम त्यांचं जीवनचरित्र वाचावं. त्यात त्यांच्या धारणांचा, कल्पनांचा, विचारांचा आणि तत्त्वज्ञानाचा सारांश जागोजागी येत असतो. कारण ते सगळं मिळूनच 'कृष्णमूर्ती' हे अखंड व्यक्तिमत्त्व तयार होतं. अन्यथा त्यांच्या चरित्रात व्यक्तिगत म्हणावं, असं फारसं काही नाही. कारण पहिली गोष्ट म्हणजे त्यांना खाजगी जीवनच नव्हतं. 'जगाला मार्गदर्शन करणं' याच कार्यासाठी त्यांचा जन्म होता आणि त्यांनी जीवनभर तेच केलं. त्यांचं संपूर्ण जगभर अखंड भ्रमण सुरू असायचं. त्यांचे व्याख्यान दौरे, पुस्तकं, गटचर्चा, संवाद, सर्व थरातील माणसांच्या भेटी हाच त्यांचा दैनंदिन कार्यक्रम असायचा. व्यक्तिगत आयुष्यात ते अखंड ब्रह्मचर्य पाळून राहिले. त्यांच्या गरजा फारच कमी होत्या. शिक्षण जवळपास नव्हतंच. बाकी दिनक्रम शिस्तबद्ध होता. चालणं, व्यायाम करणं, शक्य तितक्या स्वावलंबनानं राहणं इतकंच काय ते माफक वैयक्तिक जीवन म्हणता येईल.

पण मग जर इतकं रुक्ष आयुष्य ते जगले असतील, तर त्यांचं आयुष्य इतकं गूढ का बनून राहिलं आहे? हा खरा प्रश्न आहे, त्यासाठी त्यांचं चरित्र वाचण्यापासूनच सुरुवात करावी लागेल.

नवीन वाचकाला त्यापूर्वी काही गोष्टी माहीत करून घ्याव्या लागतील. कृष्णमूर्ती सुरुवातीला थिऑसफीशी निगडित राहिले. त्यासंबंधी थोडं जाणून घ्यावं लागेल; पण ते पुस्तकात सुरुवातीला दिलंच आहे. त्याखेरीज भारतीय तत्त्वज्ञानातील किंवा अध्यात्मातील काही महत्त्वाच्या गोष्टी जाणून घ्याव्या लागतील. कृष्णमूर्तींचं चरित्र लिहिताना मला त्यांचं व्यक्तिमत्त्व कसं वाटलं

आणि माझ्या मर्यादित माहिती आणि आकलनानुसार मला काय काय जाणवलं, याबाबत मी पुस्तकात त्या त्या ठिकाणी थोडक्यात दिलंच आहे, त्याखेरीज इथेही काही मुद्दे मांडत आहे. वाचकाला त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा काहीसा अंदाज येऊ शकेल. बाकी, ते म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येकानं आपल्या आत डोकावून स्वत:च काय ते शोधून काढायचं आहे.

कृष्णमूर्तींवर काही विशिष्ट अशी गूढ 'प्रक्रिया' व्हायची. ती वेदनादायी असायची आणि ते स्वत:च्या शरीरातून बाहेर पडायचे. मग पुन्हा आत यायचे. हा काय प्रकार होता? तर माझ्या माहितीप्रमाणे, आपल्या अध्यात्मशास्त्रात चार देहांची कल्पना केलेली आहे : स्थूल देह (म्हणजे जो आपल्या डोळ्यांना दिसतो तो), सूक्ष्म देह (वासनायुक्त जीव), कारण देह (आत्मा) आणि महाकारण देह (परमात्मा). यातील सूक्ष्म देहानं कृष्णमूर्ती स्थूल देहाच्या बाहेर पडत असत. असं करता येणं शक्य असतं असं आपल्याला बऱ्याच पारमार्थिक, गूढ पुस्तकांमध्ये वाचायला मिळेल. याखेरीज आणखीही बऱ्याच गूढ गोष्टी त्यांच्याबाबत घडल्या. यातील 'प्रक्रिया' या लोकविलक्षण प्रकाराचं वर्णन वाचून मला तिबेटी लामा श्री. लोबसंग राम्पा यांच्या पुस्तकांची आठवण झाली. या लामांनी आपलं आत्मचरित्र तीन भागात लिहिलं आहे. वाचकांनी ते अवश्य वाचावं.

थिऑसफीच्या संदर्भात ज्या महात्मा मौर्य आणि महात्मा कुथुमी यांचा उल्लेख केला गेला आहे, ते तिबेटमधलेच ऋषी होते. ते अनेक वर्षं जिवंत होते. नुसतेच जिवंत नव्हते, तर त्यांच्या देहाची झिजून वार्धक्य येण्याची प्रक्रिया थांबलेली होती. हा उल्लेख वाचून सद्गुरू बाबाजी यांची आठवण होते. हे एक महान साधू असून गेली कित्येक शतकं ते हिमालयात वास्तव्य करून असल्याचा उल्लेख बऱ्याच ठिकाणी आढळतो. उदा. "Autobiography of a Yogi' या पुस्तकाचे लेखक श्री. योगानंद स्वामी यांच्या गुरूंच्या गुरूंना, म्हणजे पू. लाहिरी महाशयांना याच प.पू.बाबाजींनी दीक्षा दिल्याचा उल्लेख त्यांच्या पुस्तकात आढळतो. इतकी शतकं जगूनही ते कायम तरुणच दिसत असत. याखेरीज श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या चरित्रात ज्या चांगदेवांचा उल्लेख आढळतो, तेही योगबळावर चौदाशे वर्षं जगल्याचा उल्लेख आहे. शिवाय महात्मा कुथुमी आणि महात्मा मौर्यांच्या संदर्भात उल्लेख झालेल्या एकाच वेळी महात्मे अनेक ठिकाणी प्रकट